DNS BANK
डोंबिवली नागरी सहकारी बँक लि.
(मल्टी-स्टेट शेड्यूल्ड बँक)
अर्थाला विश्वास मिळे अन् विश्वासाला अर्थ मिळे!

# आयोजित
# ग्राहकांसाठी घरगुती गणपती आरास/ सजावट स्पर्धा

ग्राहकांच्या कलागुणांना प्रोत्साहन मिळावे या उद्देशाने बँकेने घरगुती गणपती आरास / सजावट स्पर्धेचे आयोजन केले आहे. या स्पर्धेचे हे पाचवे वर्ष आहे. मागील वर्षी ह्या स्पर्धेमध्ये जवळजवळ शेकडो ग्राहकांनी सहभाग घेतला होता. त्यातील उत्कृष्ट असलेल्या **स्पर्धकांना मान्यवरांच्या हस्ते रोख पारितोषिके व प्रमाणपत्रे** देण्यात आली. ह्यावर्षी देखील बँकेने या स्पर्धेचे आयोजन केले आहे. या स्पर्धेकरीता ग्राहकाने स्वत:च्या घरात स्थापन केलेल्या **गणपतीच्या मूर्ती व सजावटीचा फोटो दि.२५ ऑगस्ट ते ४ सप्टेंबर २०१७ या कालावधीत** dnsbank.wordpress.com **येथे पाठवायचा** आहे. विजेत्यांना मान्यवर व्यक्तींच्या हस्ते **प्रशस्तिपत्रक व रोख पारितोषिक** देण्यात येणार आहे. स्पर्धेकरीताचे निकष खालीलप्रमाणे आहेत.

## घरगुती गणपती आरास / सजावट स्पर्धेकरीता असणारे निकष

१) ही स्पर्धा फक्त बँकेच्या खातेधारकांसाठीच आयोजित केली असून कोणत्याही शाखेतील खातेदार या स्पर्धेत सहभाग घेऊ शकतील. स्पर्धकाचे खाते बँकेत नसल्यास त्यांनी प्रथम आपले खाते उघडावे व नंतरच स्पर्धेमध्ये सहभाग घ्यावा.तसेच खातेदाराचा ई-मेल Gmail मधे असणे आवश्यक आहे.

२) पर्यावरण स्नेही वस्तूंपासून केलेल्या मूर्तीला तसेच सजावटीला प्राधान्य दिले जाईल.

३) स्पर्धकांनी काढलेले फोटो शाखेमध्ये स्वीकारले जाणार नाहीत. सजावटीचा फोटो हा JPG,BMP, PNG, TIF या प्रकारामध्ये असावा. सजावटीचा फोटो ई-मेल करतांना त्याच ई-मेलमध्ये ग्राहकाने त्यांचे नांव, खाते क्रमांक, शाखेचे नांव, आपला संपूर्ण पत्ता, मोबाईल नंबर व आरास / सजावटीसाठी वापरलेले साहित्य लिहावे. वरील सर्व माहिती ई-मेलमध्ये नसल्यास तसे आलेले ई-मेल हे ग्राह्य धरले जाणार नाहीत.

४) स्पर्धेमध्ये उत्कृष्ट आरास /सजावटीस गुणानुक्रमे मान्यवरांच्या हस्ते प्रशस्तिपत्रक व पारितोषिक देण्यात येईल. एकूण १० पारितोषिकांमध्ये, प्रथम पारितोषिक ₹ ५,०००/- असून शेवटचे पारितोषिक ₹ ५००/- असेल.

**★ परिक्षकांचा निर्णय अंतिम राहील. ★ स्पर्धेबाबतीतील संयोजकांचे सर्व निर्णय अंतिम राहतील.**